**<u>ठळक बातम्या</u>**

- संपूर्ण देश आणि केंद्र सरकार वायनाड इथल्या भूस्खलनानं बाधित लोकांच्या पाठीशी उभा असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन

- ऊस पिकाव्यतिरिक्त मका, तांदूळ, फळं आणि बांबू यांच्या माध्यमातून इथेनॉल निर्मिती करण्यासाठी बहुआयामी आणि भविष्यवादी दृष्टिकोन स्वीकारण्याची गरज केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांच्याकडून व्यक्त

- इस्त्रायलने गाझापट्टीवर केलेल्या हवाई हल्ल्यात ९३ पॅलेस्टिनी नागरिकांचा मृत्यू

**आणि**

- ज्येष्ठ मराठी अभिनेते विजय कदम यांचं दीर्घ आजारानं निधन

**<><><><><><>**

केरळमधल्या वायनाड इथं झालेल्या भूस्खलनामुळे बाधित लोकांच्या पाठीशी संपूर्ण देश आणि केंद्र सरकार उभं आहे असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज सांगितलं. प्रधानमंत्र्यांनी आज वायनाड इथं जिल्हाधिकारी कार्यालयात मदत आणि पुनर्वसन कामाबाबत आढावा बैठकीला संबोधित केलं. मदतकार्यासाठी राज्य सरकारला केंद्र सरकार सर्वतोपरी सहकार्य करेल असं आश्वासन त्यांनी दिलं. यादृष्टीनं राज्याच्या गरजांबाबत तपशीलवार निवेदन पाठवावं असं आवाहन त्यांनी केरळच्या मुख्यमंत्र्यांना केलं. राज्य सरकारनं भूस्खलनामुळे बाधित झालेल्या मुलांच्या भविष्यासाठी दीर्घकालीन योजना तयार करावी अशी सूचनाही त्यांनी केली.

केरळचे राज्यपाल, मुख्यमंत्री पिनाराई विजयन, आणि इतर वरिष्ठ अधिकारी या बेठकीत सहभागी झाले होते.

याआधी आज सकाळी प्रधानमंत्र्यांनी दुर्घटनाग्रस्त प्रदेशाला भेट दिली. त्यांनी आपतग्रस्त प्रदेशाचं हवाई सर्वेक्षण केलं. तसंच बचाव आणि मदतकार्याची माहिती घेतली. केरळचे मुख्यमंत्री पिनरायी विजयन यावेळी प्रधानमंत्र्यांसोबत होते. यावेळी प्रधानमंत्र्यांनी मदत शिबिरं तसंच रुग्णालयांनाही भेट दिली. दुर्घटनेत जखमी झालेल्यां आणि मृतांच्या कुटुंबीयांशी त्यांनी संवाद साधला.

या दुर्घटनेला राष्ट्रीय आपत्ती घोषित करावं अशी मागणी राज्य सरकार आणि काँग्रेसच्या नेतृत्वाखालच्या विरोधी पक्षांनी केली आहे.

दरम्यान, वायनाडमध्ये केंद्र सरकारने राबवलेल्या बचाव कार्यात आतापर्यंत ३० जणांना वाचवण्यात यश आलं आहे, तर ५२० जणांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आलं. घटनास्थळावरून ११२ मृतदेह ताब्यात घेण्यात आले आहेत.

<><><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या नवी दिल्लीत अत्यंत सुपीक आणि हवामानाला अनुकूल आणि जैव संवर्धन करणाऱ्या पिकांच्या १०९ वाणांच्या वाटपाचा प्रारंभ करणार आहेत. यावेळी ते शेतकरी आणि वैज्ञानिकांशी संवाद साधतील. यात ३४ नगदी पिकं आणि २७ बागायती पिकं आहेत. यात भरडधान्य, तेलबिया, कडधान्य, ऊस, कपाशी, तृणधान्य यांसह भाज्या, फळं, कंदमुळं, मसाले, औषधी वनस्पती, फुलं अशा विविध पिकांचा समावेश आहे.

<><><><><><>

भारत आणि तिमोर लेस्ते हे दोन्ही देश मैत्री आणि लोकशाहीविषयी वचनबद्ध असल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. तिमोर लेस्तेची राजधानी डिली इथं आयोजित कार्यक्रमात त्या संबोधित करत होत्या. तिमोर लेस्तेच्या सर्वोच्च नेत्यांशी आज राष्ट्रपतींनी द्विपक्षीय चर्चा केली असून भारतीय समुदायाशीही संवाद साधला.

<><><><><>

देशात ऊस पिकाव्यतिरिक्त मका, तांदूळ, फळं आणि बांबू यांच्या माध्यमातून इथेनॉल निर्मिती करण्यासाठी बहुआयामी आणि भविष्यवादी दृष्टिकोन स्वीकारण्याची गरज केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांनी व्यक्त केली आहे. ते आज नवी दिल्ली इथं झालेल्या राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाच्या कार्यक्रमात बोलत होते. येत्या काही वर्षांत वर्षाकाठी १ हजार कोटी लीटर इतकी इथेनॉलची गरज भासणार आहे, भविष्यात इथेनॉल इंधनाच्या निर्यातीच्या दृष्टिकोनातून उत्पादन वाढवण्याची तयारी केली पाहिजे, असं ते म्हणाले. सरकारने २०३० पर्यंत पेट्रोलमध्ये २० टक्के इथेनॉल मिसळण्याचं उद्दिष्ट ठेवलं असल्याचंही त्यांनी सांगितलं.

<><><><><>

भारतातल्या सुक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग निर्यातीत रत्ने आणि दागिने निर्यातीचा मोठा वाटा असून हिरे उत्तेजना परवाना सुरु केल्यामुळे या उद्योगांना लाभ मिळणार असल्याचं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी म्हटलं आहे. ते आज मुंबईत भारत आंतरराष्ट्रीय दागिने प्रदर्शनाच्या उद्घाटन समारंभात बोलत होते. निर्यातीला चालना मिळण्यासाठी आपलं मंत्रालय मुक्त व्यापार करारांवर स्वाक्षऱ्या करण्याची प्रक्रिया वेगाने पार पाडत असल्याची माहिती त्यांनी दिली. याबाबत, युरोपीय संघ आणि इंग्लंड सोबत चर्चा पुढच्या टप्प्यात पोहोचल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

अजिंठा लेणी रेल्वे जोडणी हा प्रादेशिक औद्योगिक विकासाला चालना देणारा हा प्रकल्प असल्याचं केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी म्हटलं आहे. त्यांनी आज नवी दिल्ली इथं बातमीदारांना या प्रकल्पाविषयी माहिती दिली. या प्रकल्पाअंतर्गत जालना ते जळगाव असा १७४ किलोमीटर लांबीचा रेल्वेमार्ग

विकसित केला जाईल. या प्रकल्पासाठी ९३५ हेक्टर जमीन संपादित केली जाणार असून पुढच्या चार ते पाच वर्षांत हा प्रकल्प पूर्ण होणं अपेक्षित असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><><>

सरकार बँकिंग क्षेत्रात बहुप्रतिक्षित सुधारणा राबवत असल्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. त्या आज रिझर्व्ह बँकेच्या मध्यवर्ती संचालक मंडळाच्या बैठकीला उपस्थित राहिल्यानंतर बातमीदारांशी बोलत होत्या. बँकिंग नियमन सुधारणांची दीर्घ काळापासून गरज होती असं त्यांनी सांगितलं. केंद्रीय अर्थसंकल्पानंतर तसंच लोकसभेनं काही सुधारणांसह वित्त विधेयकाला मंजुरी दिल्यानंतर ही बैठक घेण्यात आली. बँकांनी आपल्या व्यवहारात कोअर बँकिंगवर लक्ष केंद्रित करण्याच्या आवश्यकतेवर अर्थमंत्र्यांनी भर दिला.

<><><><><><>

प्रसार भारतीचे अध्यक्ष नवनीत कुमार सेहगल यांनी दोन दिवसांच्या मुंबई दौऱ्यादरम्यान आज आकाशवाणी मुंबई केंद्राला भेट दिली आणि सर्व विभागांच्या कामाचा आढावा घेतला. श्रोत्यांना आवडण्याजोग्या कार्यक्रमांवर लक्ष केंद्रित करण्याची सूचना त्यांनी आकाशवाणीच्या अधिकाऱ्यांना बैठकीदरम्यान केली. युवा आणि महिला केंद्रित कार्यक्रमांवर अधिक भर ध्यावा, आर्थिक आत्मनिर्भरतेच्या दृष्टीने अधिकाधिक कार्यक्रम जाहिरातदारांपर्यंत घेऊन जावेत, अशी सूचनाही त्यांनी केली. वृत्तविभागाच्या प्रमुख सरस्वती कुवळेकर, कार्यक्रम प्रमुख नारायण पवार, कार्यालय प्रमुख श्रीकृष्ण क्षीरसागर यांच्यासह आकाशवाणी आणि दूरदर्शनचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

<><><><><><>

केंद्रीय आयुष  कुटुंब कल्याण राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांच्या हस्ते आज हत्तीरोग निर्मूलनासाठी द्वैवार्षिक सार्वत्रिक औषधोपचार मोहीमेच्या दुसऱ्या टप्प्याचं

दूरदृष्य प्रणालीद्वारे उद्धाटन झालं. हत्तीरोग हा कायमस्वरूपी आजार असल्यानं, या आजारानं बाधित रुग्णांना दिव्यांगांचे लाभ मिळण्यासाठी यासाठी विनाविलंब ४५ टक्के दिव्यंगत्वाचं प्रमाणपत्र देण्याची सूचनाही त्यांनी केली. याअंतर्गतचं पहिलं प्रमाणपत्र बुलढाणा इथे इथल्या हत्तीरोगग्रस्त महिलेलाजाधव यांच्या हस्ते देण्यात आलं.

**<><><><><><>**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत अर्ज केलेल्या महिलांना तीन महिन्यांचे पैसे मिळतील. येत्या १७ तारखेला ओवाळणी म्हणून दोन महिन्यांचं अनुदान खात्यात जमा केलं जाईल, असं मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी म्हटलं आहे. ते आज धुळ्यात झालेल्या सभेत बोलत होते. या योजनेअंतर्गत एकही पात्र बहीण वंचित राहणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली.

**<><><><><><>**

घरोघरी तिरंगा या अभियानात राज्यातले सर्व स्तरातले नागरिक सहभागी होत आहेत. अनेकांनी आपल्या घरी तिरंगा ध्वज फडकावला असून समाज माध्यमावरही तिरंग्याचं चित्र लावलं आहे. मराठी चित्रपटसृष्टीसह विविध क्षेत्रातले मान्यवर यात सहभागी झाले आहेत.

घरोघरी तिरंगा अभियानाविषयी ज्येष्ठ अभिनेते शिवाजी साटम यांनी आकाशवाणीला सांगितलं…

**होल्ड--बाईट - शिवाजी साटम**

**<><><><><><>**

ज्येष्ठ मराठी अभिनेते विजय कदम यांचं आज दीर्घ आजारानं निधन झालं. ते ६७ वर्षांचे होते. काही काळापूर्वी त्यांना कर्करोगाचं निदान झालं होतं. आज दुपारी त्यांच्या पार्थिवावर मुंबईतल्या ओशिवरा स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. मराठी नाटक, चित्रपट आणि मालिकांमध्ये त्यांनी विविध भूमिका केल्या.

१९८० आणि ९०च्या दशकात त्यांनी रंगभूमीवर केलेल्या विनोदी भूमिका प्रचंड गाजल्या. रुपेरी पडद्यावरही त्यांनी अनेक अनेक भूमिकांमधून सकस अभिनयाचं प्रत्यंतर दिलं. नाट्यदर्पणचा सर्वोत्कृष्ट लोकनाट्य कलाकाराचा पुरस्कार त्यांना मिळाला होता.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांनी विजय कदम यांना समाज माध्यमावरच्या संदेशातून आदरांजली वाहिली आहे.

**<><><><><><>**

इस्त्रायलने गाझापट्टीवर केलेल्या हवाई हल्ल्यात ९३ पॅलेस्टिनी नागरिकांचा मृत्यू झाला. हल्ला झालेला भाग गाझाच्या पूर्वेला आहे. या भागात विस्थापितांनी आश्रय घेतला असून पहाटेच्या प्रार्थनेच्या वेळी हा हल्ला झाल्याची माहिती गाझाच्या स्थानिक सुरक्षा संस्थेनं दिली आहे. हमासच्या दहशतवाद्यांना ठार करण्यासाठी हा हल्ला केल्याची माहिती इस्त्रायलच्या संरक्षण दलानं दिली आहे.

**<><><><><><>**

बांगलादेशच्या सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश ओबेदुल हसन यांनी आपल्या पदाचा राजीनामा द्यायचे ठरवले आहे. आज सकाळी विद्यार्थी, वकील आणि इतर काही लोक सर्वोच्च न्यायालयाच्या आवारात जमले होते. त्यांनी अपील विभागाच्या मुख्य न्यायाधीश आणि  इतर न्यायाधीशांना दुपारी १ वाजेपर्यंत राजीनामा देण्याची मुदत दिली होती. अन्यथा त्यांच्या निवासस्थानाला घेराव घालण्याचा इशारा दिला होता.

**<><><><><><>**

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये आज भारताची कुस्तीपटू रीतिका हूडा हिला ७६ किलो वजनी गटात हार पत्करावी लागली. किर्गिस्तानची अव्वल मानांकित कुस्तीपटू मेडेट कायझी ऐपेरी हिनं रीतिकाचा पराभव केला.  गोल्फमध्येही अदिती अशोक

आणि दीक्षा सागर यांना अनुक्रमे ३३ व्या आणि ५१ व्या स्थानावर समाधान मानावं लागल्याने ऑलिम्पिक स्पर्धेतून बाहेर पडावं लागलं.

//<><><><><><>//